शहर अभियंता कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. मआ/शअजा/ज/८४४४
दिनांक/ 9८/८/2022

कार्यालयीन परिपत्रक

विषय :- नवीन निवासी इमारतींना बांधकाम परवानगी देतेवेळी इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधेची अट अंतर्भूत करणेबाबत.

संदर्भ :-१. मे. शासन निर्णय मइवाधो -२०२१/प्र.क्र. २५/तांक्र ४ दिनांक २३/०७/२०२१.
२.दिनांक ०८/०६/२०२२ रोजी मा. महापालिका आयुक्त कार्यालयामध्ये घेण्यात आलेली बैठक.
३.दि.२७/०६/२०२२ रोजी क्रेडाई पुणे, मराठी बांधकाम व्यावसायिक संघटना यांचे समवेत घेण्यात आलेली बैठक.

"महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१" राबविणेस मे.महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण व वातावरणीय बदल समितीने संदर्भांकित शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार नवीन निवासी इमारतींना तसेच अन्य वापराच्या इमारतींना बांधकामास मान्यता देतेवेळी सदर शासन निर्णयातील अ.क्र. ७ ते १० येथे नमूद बाबींचा उल्लेख करणे बंधनकारक असेल असे शासन निर्णयात नमूद आहे. सदर विषयाच्या अनुषंगाने वरील संदर्भ क्र.२ व ३ येथे नमूद केल्याप्रमाणे घेण्यात आलेल्या बैठकीस अनुसरून खालील मुद्दे कायम करण्यात आले आहेत,

१. दिनांक १५.०७.२०२२पासून नवीन निवासी इमारतींना बांधकाम परवानगी देतेवेळी सदर मान्यतेच्या अटींमध्ये इलेक्ट्रिक वाहन चार्जिंगसाठी अतिरिक्त इलेक्ट्रिक लोड विद्युत महामंडळाकडून मान्य करून घेणेच्या अटींचा समावेश करणेत यावा.
२. नवीन निवासी इमारतींचे बांधकाम प्रस्तावामध्ये २० पेक्षा अधिक चारचाकी वाहनांसाठी अचल पार्किंग- Immovable Parking संख्या असल्यास सदर पार्किंग संख्येच्या २०% संख्येसाठी इलेक्ट्रिक चार्जिंग पॉइंट ठेवण्यात यावा व सदर २०% पैकी ३०% क्षेत्र हे समाईक पार्किंग क्षेत्रामध्ये असावे किंवा एकूण सामाईक पार्किंग संख्येच्या २०% पार्किंग क्षेत्र हे इलेक्ट्रिक चार्जिंग पॉइंटसह उपलब्ध करून देणेत यावे.
३. नवीन व्यावसायिक, शैक्षणिक संस्था, शॉपिंग मॉल्स, मल्टीप्लेक्स, हॉटेल्स, हॉस्पिटल्स, आय टी पार्क बांधकाम प्रस्तावामध्ये ५० पेक्षा अधिक अचल पार्किंग (Immovable Parking) चारचाकी वाहनांची पार्किंग सुविधा असल्यास अशा मिळकतींमध्ये एकूण पार्किंगच्या २५% हे इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी सुसज्ज चार्जिंग व्यवस्थेसह राखीव ठेवणे बंधनकारक राहील व त्याकरिता आवश्यक असलेला अतिरिक्त लोड विद्युत महामंडळाकडून मंजूर करणेत यावा.
४. अस्तित्वातील वा चालू असलेल्या व्यावसायिक तसेच शैक्षणिक संस्था, शॉपिंग मॉल्स, मल्टीप्लेक्स, हॉटेल्स, हॉस्पिटल्स, आयटी पार्कचा वापर असलेल्या मिळकतींमध्ये ५०पेक्षा अधिक चारचाकी वाहनांची पार्किंग सुविधा असल्यास अशा मिळकत धारकांना एकूण चारचाकी पार्किंग क्षेत्राच्या १०% अचल पार्किंग (Immovable Parking)हे इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी सुसज्ज चार्जिंग व्यवस्थेसह राखीव ठेवणेकरिता संदर्भ क्र.१ चा शासन निर्णय राबविणेचे दृष्टीकोनातून आवाहन करण्यात येत आहे.

*टिप* :- 30% समाईक पार्किंगक्षेत्र हे ईव्ही चार्जिंगबाबत, भारतीय उर्जा मंत्रालयाने दिनांक १४ जानेवारी २०२२ जारी केलेल्या क्र.१२/०२/२०१८-EV (कॉम्प क्रमांक २४४३४७) च्या निर्णयातील अंतिम एकत्रित ईव्हीसीएल मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित आणि NITI आयोग हँड बुकवर आधारित इलेक्ट्रिक व्हेईकल चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर अंबलबजावणी नुसार, १ एसी स्लो चार्जर (AC) हा 3 EV च्या समतुल्य असेल आणि १ फास्ट चार्जर (DC) हा 10 EVS चारचाकीच्या समतुल्य असेल.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका